**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 27/05/2025

**आरोपी लोकसेवक**- 1) श्री. दिलीप मधुकर त्रिभुवन, वय 40 वर्षे, व्यवसाय - नौकरी, पद- महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर ( वर्ग 3)

2) श्री विनोद गोंडुराव खिरोळकर, वय 51वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद- निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर (वर्ग 1) यांनी तक्रारदार व त्यांच्या पार्टनर यांनी मौजे तिसगाव, छत्रपती संभाजीनगर येथील 6 एकर 16 गुंठे जमीन ही वर्ग 2 ची असल्याने सदर जमीन शासनाची परवानगी घेऊन सर्व नियमानुसार रजिस्टरीं खरेदी खत करून सन 2023 मध्ये विकत घेतली आहे. सदर जमीन ही वर्ग 2 ची असल्याने ती खरेदी करण्यासाठी शासनास लागणारे चलन जेनरेट करून देण्यासाठी अलोसे 1 व 2 यांनी 23 लाख रुपये मागणी करून या पूर्वी तक्रारदार यांचे कडून 23 लाख रुपये घेतलेले आहे. सदर जमीन वर्ग 2 मधून वर्ग 1 मध्ये करण्यासाठी नजराणा शासनास पुन्हा भरावयाचा असल्याने त्यासाठी लागणारे चलन पुन्हा जनरेट करून देण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार व त्यांचे पार्टनर यांचेकडे दिनांक 26/05/2025 रोजी 18,00,000/- (आठरा लाख रुपये) लाचेची मागणी करुन दिनांक 27/05/2025 रोजी 5,00,000/- (पाच लाख रुपये) स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिटीचौक, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक- 1) श्री. दिलीप मधुकर त्रिभुवन, वय 40 वर्षे, व्यवसाय - नौकरी, पद- महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर ( वर्ग 3).<br>2) श्री विनोद गोंडुराव खिरोळकर, वय 51वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद- निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर (वर्ग 1). |
| लाच मागणी रक्कम | :- | 18,00,000/- रुपये (अक्षरी :- अटरा लाख रुपये) त्यापैकी 5,00,000/- (अक्षरी :- पाच लाख रुपये ) पहिल्यांदा व फाईल कंप्लेंट झाल्यानंतर बाकी राहिलेली लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. |
| लाच स्विकृती रक्कम | | 5,00,000/- (अक्षरी :- पाच लाख रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | :-<br>:-<br>:- | श्री. शांतीलाल चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. दिलीप साबळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार व त्यांच्या पार्टनर यांनी मौजे तिसगाव, छ. संभाजीनगर येथील 6 एकर 16 गुंठे जमीन ही वर्ग 2 ची असल्याने सदर जमीन शासनाची परवानगी घेऊन सर्व नियमानुसार रजिस्टरीं खरेदी खत करून सन 2023 मध्ये विकत घेतली आहे. सदर जमीन ही वर्ग 2 ची असल्याने ती खरेदी करण्यासाठी शासनास लागणारे चलन जेनरेट करून देण्यासाठी अलोसे 1 व 2 यांनी तक्रारदार यांचेकडे 23,00,000/- (तेवीस लाख) रुपये मागणी करून या पूर्वी तक्रारदार यांचेकडून 23,00,000/- (तेवीस लाख) रुपये घेतलेले आहे. सदर जमीन वर्ग 2 मधून वर्ग 1 मध्ये करण्यासाठी नजराणा शासनास पुन्हा भरावयाचा असल्याने त्या साठी लागणारे चलन पुन्हा जनरेट करून देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | तक्रारदार व त्यांच्या पार्टनर यांनी मौजे तिसगाव, छ. संभाजीनगर येथील 6 एकर 16 गुंठे जमीन ही वर्ग 2 ची असल्याने सदर जमीन शासनाची परवानगी घेऊन सर्व नियमानुसार रजिस्टरीं खरेदी खत करून सन 2023 मध्ये विकत घेतली आहे. सदर जमीन ही वर्ग 2 ची असल्याने ती खरेदी करण्यासाठी शासनास लागणारे चलन जेनरेट करून देण्यासाठी अलोसे 1 व 2 यांनी तक्रारदार यांचेकडे 23,00,000/- (तेवीस लाख) रुपये मागणी करून या पूर्वी तक्रारदार यांचे कडून 23,00,000/- (तेवीस लाख) रुपये घेतलेले आहे. सदर जमीन वर्ग 2 मधून वर्ग 1 मध्ये करण्यासाठी नजराणा शासनास पुन्हा भरावयाचा असल्याने त्यासाठी लागणारे चलन पुन्हा जनरेट करून देण्यासाठी आलोसे हे तक्रारदार व त्यांचे पार्टनर यांचे कडे लाच म्हणून 18,00,000 (आठरा लाख) रुपये ची मागणी करीत होते. अशी तक्रार दि 23/05/2025 रोजी तक्रारदार यांनी दिली.<br>त्याअनुषंगाने दिनांक 26/05/2025 रोजी लाच मागणी पडताळणी केली असता निवासी उप |

| | | |
|---|---|---|
| | | जिल्हाधिकारी यांचे केबिनमध्ये तक्रारदार, आलोसे श्री. विनोद खिरोळकर, व आलोसे श्री. त्रिभुवन यांच्यात लाच रकमेबाबत बोले झाले व 5,00,000/- (पाच लाख) रुपये पहिले व फाईल कंम्प्लेट झाल्यावरन फायनल पेमेंट 13,00,000/- (तेरा लाख) रुपये रक्कम देण्याचे ठरले. दिनांक 27/05/25 रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री. दिलीप त्रिभुवन यांनी तक्रारदार यांचे कडून जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजी नगर समोर रोडवर 5,00,000/- (पाच लाख) रुपये लाच रक्कम स्वीकारली असता आलोसे क्रमांक 1 व 2 यांना ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे.सिटीचौक, छत्रपती संभाजीनगर शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 , 7अ ,12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक मा.श्री.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक सुरेश ह. नाईकनवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. शांतीलाल चव्हाण, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक, अमोल धस, केशव दिंडे, चैनसिंग गुसिंगे, पो.ह.राजेंद्र सिनकर, इंगळे, जिवडे, बनकर, नागरगोजे, रविंद्र काळे, घुगरे, पो.अं., अनवेज शेख, युवराज हिवाळे, सचिन बारसे, अनवेज शेख, कंदे, डोंगरदिवे, राम गोरे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.